# प्रमाणपत्र

श्री. पांडुरंग वि. डोंगळे यांनी "शाहीर परशराम यांच्या लावण्या" हा प्रबंध शिवाजी विद्यापीठातील मराठी विषयाच्या एम्.फिल्. (मराठी) पदवीसाठी अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून सादर केला आहे.

श्री. पांडुरंग वि. डोंगळे यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली हा शोध-प्रबंध स्वतंत्ररीत्या लिहिला असून तो इतर कोणत्याही विद्यापीठातील अन्य पदवीसाठी सादर केलेला नाही.

कोल्हापूर :

दिनांक : २४।६।१९९३

मार्गदर्शक,
डॉ. वसंत स. जोशी,
माजी पदव्युत्तर मराठी विभाग प्रमुख,
किसनवीर महाविद्यालय,
वाई.

.....

:: प्र ति ज्ञा ::

"शाहीर परशराम यांच्या लावण्या" हा प्रबंध मी प्रत्यक्ष पाहणी आणि माहितीच्या आधारे शिवाजी विद्यापीठातील मराठी विषयाच्या "एम्.फिल्. (मराठी)" पदवीकरिता अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून सादर करीत आहे.

मी हा प्रबंध माझे मार्गदर्शक डॉ. वसंत स. जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली वास्तव स्वरूपातील उपलब्ध माहितीच्या आधारे लिहिला आहे व शाहीर परशरामाच्या लावण्यांचे सर्वसाधारण स्वरूप जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

कोल्हापूर.
दिनांक : २४।६।१९९३.

अभ्यासक,
प्रा. पांडुरंग वि. डोंगळे,
प्राध्यापक भोगावती महाविद्यालय,
कुरूकली.

.....

"शाहीर परशराम यांच्या लावण्या"

## अ नु क्र म णि का

पान नंबर

ऋ ण नि र्दे श

भू मि का

प्रकरण पहिले : लावणी वाङ्मयाचा उदय, स्वरूप, प्रकार --- १ ते ३८

प्रास्ताविक -

१) संतकाव्याचा विचार

२) पंडिती काव्याचा विचार

१) शाहिरांचे पोवाडे

२) शाहिरांच्या लावण्या

लावणीचा उदय -

१) लावणी या शब्दाबद्दल विविध उत्पत्ती.

लावणीचे स्वरूप -

लावणीचे प्रकार -

१) शृंगारिक लावण्या

२) विविध विषयावरील लावण्या

३) आध्यात्मिक व भेदीक लावण्या

पान नंबर

प्रकरण दुसरे : लावणी कालाचे ओघवते दर्शन - - - - - ३८ ते ५६

१) उलटा सुलटा आया जमाना,

२) आंधार नगरी बेबंद राजा,

३) बुडाला धर्म हरपले नाणे,

प्रकरण तिसरे : शाहीर परशरामाचे जीवन चरित्र - - - - - ५७ ते ६९

१) चरित्रविषयक भूमिका

२) चरित्राची साधन सामग्री

३) परशरामांचा जन्म व घर

४) शाहीर परशरामाचा व्यवसाय

५) शाहीर परशरामांचा अभ्यास व साक्षात्कार

६) शाहीर परशरामाची गुरुपरंपरा

७) परशरामाचे साथीदार

८) परशरामाचे व्यक्तिमत्व

९) बाजीराव पेशवा व परशराम भेटीचा प्रसंग

१०) परशरामाची कवने.

११) शाहीर परशरामाचे व्यक्तिदर्शन

१२) शाहीर परशरामाच्या मृत्यूबद्दलची कथा

प्रकरण चौथे : शाहीर परशरामांच्या लावण्यांचे वर्गीकरण - - - ७० ते १३५

१) शृंगारिक लावण्या

२) आध्यात्मिक लावण्या

३) सामाजिक लावण्या

पान नंबर

४) पौराणिक लावण्या

५) ईश्वरवर्णनपर लावण्या

६) इतर लावण्या

१) कथाकथनपर लावण्या

२) उपदेशपर लावण्या

३) विनोदी लावण्या

४) हिंदी लावण्या

५) पोवाडे

प्रकरण पाचवे : शाहीर परशरामांच्या काव्याचे विशेष ---- १३८ ते १४८

१) शाहीर परशरामाचे विविध व्यक्तिमत्व

२) लावण्यातील विविधता

३) परिसराचा अभिमान

४) म्हणी व वाक्प्रचार

५) शब्दांची अचूक निवड

६) विविध रसरंगाची उधळण

७) लावण्यातील शृंगार

८) लावण्यातील सामाजिकता

९) लावण्यातील स्वभावचित्रणे

१०) परशरामांचा अध्यात्मपरता आवडीचा विषय

११) कथेची नाट्यपूर्ण मांडणी

१२) विनोद

समारोप - ---- १४८ ते १५२

संदर्भ ग्रंथ सूची - ---- १५३ ते १५६

# ऋ ण नि र्दे श


शिवाजी विद्यापीठाच्या "एम्.फिल्. (मराठी) पदवीसाठी माझा "शाहीर परशराम यांच्या लावण्या" हा लघुप्रबंध तयार करीत असताना माझ्या अभ्यासाला दिशा देण्याच्या कामी ज्या व्यक्तीचे सहकार्य मिळाले त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे.

या प्रबंधाच्या विषय निवडीपासून माझे प्रबंधाचे मार्गदर्शक गुरुवर्य डॉ. वसंत स. जोशी यानी संशोधनाबाबत वारंवार चर्चा करून योग्य ते मार्गदर्शन केले. त्यानी केलेल्या अनमोल मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

तसेच शिवाजी विद्यापीठ, मराठी विभाग प्रमुख डॉ. ल.रा. नसिराबादकर व त्यांचे सहकारी प्राध्यापक वर्ग, कर्मचारीवर्ग, तसेच भोगावती महाविद्यालयाचे प्राचार्य एस्.टी. जाधव, प्राध्यापकवर्ग, ग्रंथपाल व कर्मचारीवर्ग, हा प्रबंध पूर्ण करण्यासाठी माझे माता-पिता, भावंडे व मित्रवर्ग या सर्वांनी जे सहकार्य केले त्याबद्दल त्यांचाही मी ऋणी आहे.

माझ्या प्रबंधाची ~~टंकलेखीत~~ झिरॉक्स प्रत व्ही.डी. खाडे यांनी तयार करून दिली याबद्दल मी त्यांचेही आभार मानतो.

संशोधक,
पांडुरंग डोंगळे.


.....

## भूमिका

मध्ययुगीन मराठी साहित्यामध्ये झालेली काव्यनिर्मिती ही परिवर्तनवादी व मनोरंजक स्वरूपाची आहे. असा या काव्यवाङ्मयामध्ये शाहिरी वाङ्मय हे महत्वपूर्ण काव्य आहे. या शाहिरी वाङ्मयाने राजेरजवाड्यापासून ग्रामीण भागातील सर्व सामान्य लोकांचे मनोरंजन केले आहे. या शाहिरी वाङ्मयामध्ये वाङ्मयगुण संपन्न अशी रत्नेही आढळतात. आपल्या अंगभूत गुणांनी ती वाङ्मयीन गुणवत्ता प्राप्त करतात आणि वाचक अभ्यासकाचे मन वेधून घेतात अशा निवडक कलाकृती-काव्यरत्ना-पैकी "शाहीर परशराम" ही व्यक्ती शाहिरी काव्यामध्ये अगळी वेगळी म्हणून प्रसिध्द आहे. या शाहीर परशरामाच्या लावण्यांचा शोध प्रबंधिकेत घेतला आहे.

शाहीर परशरामाचा अनेक संशोधकानी अभ्यास केला आहे. त्या संशोधकांचा परामर्श थोडक्यात खालील प्रमाणे.

१) शाहीर परशरामांच्या लावण्यांचे संग्रह प्रसिध्द करण्याचे काम इ.स. १९०७ पासून चालू आहे. परशरामांचा रचनांचा पहिला संग्रह प्रसिध्द करण्याचे श्रेय शाहिरी वाङ्मयाचे अभ्यासक श्री. शं.तु. शालिग्राम यांचेकडे जाते. त्यानी परशरामांच्या गंगाथडीत मिळालेल्या निवडक लावण्या व पोवाडे यांचा संग्रह इ.स. १९०७ साली संपादन केला व गंगाधर गोविंद गोंधळेकर यांच्या भारत भूषण छापखान्यात छापून प्रसिध्द केला. त्यात परशरामाचे चरित्र दिले असून परशरामाच्या रचनांची चार विभागात विभागणी केली आहे. ब-याचशा रचना छापताना कवितेच्या स्वरूपात छापलेल्या आहेत.

२) शाहीर परशरामाच्या लावणीची दुसरी आवृत्ती श्री शं.न. जोशी यांनी पुणे येथे इ.स. १९२४ साली चित्रशाळा छापखान्यात

प्रसिध्द केली. ही आवृत्ती विस्तृत चरित्रासह आहे असे संपादकाचे म्हणणे आहे. पण शालिग्रामानी लिहिलेल्या चरित्राचीच त्यात जवळ जवळ पुनरावृत्ती आहे. या आवृत्तीमध्ये लावण्या छापताना छंदवृत्तांचा विचार केलेला नाही. एकापुढे एक ओळ धावती मांडणी केलेली आहे.

३) यानंतर परशरामाच्या लावण्यांचा संग्रह भाग परशराम कवी-कृत्य बोधपर व शास्त्रोक्त परशराची लावण्या भाग १, २, ३ श्री वि.ना. कोल्हारकर यांनी असा संग्रहीत केला तो तुकाराम पुंडलीक शेटे, बुक्सेलर आणि पब्लिशर यांनी सर्व हक्कांसह विकत घेऊन एक *रमणा* छापखान्यात छापून माधव बाग मुंबई येथे इ.स. १९२४ साली प्रसिध्द केला. या संग्रहात लावण्यांची संख्या १४४ आहे. पोवाड्याचा समावेश यात नाही. शालिग्राम व जोशी यांच्या संग्रहामध्ये असलेल्या काही लावण्या या संग्रहात चित्रित केलेल्या आहेत.

४) परशरामची लावणी १७ हा छोटेखानी लावण्यांचा संग्रह माधव रघुनाथ क्षीरसागर, ६५४, शुक्रवार पेठ, पुणे २ यांनी प्रसिध्द केला आहे. तो कोणत्या वर्षी प्रसिध्द झाला हे मात्र त्यानी नमूद केलेले नाही.

५) शाहीर परशरामाच्या लावण्यांचा समावेश म.ना. अदवंत यांनी पैंजण या ग्रंथामध्ये केला आहे. यामध्ये शाहीर परशरामाच्या जीवन चरित्राची माहिती घेऊन त्यांच्या महत्वाच्या लावण्यांचा विचार केला आहे. हा पैंजण ग्रंथ भा.ल. कुलकर्णी साहित्य प्रसार केंद्र यानी प्रसिध्द केला आहे.

६) डॉ. गं.ना. मोरजे यांनी शाहीर परशरामाच्या १४० लावण्या व पोवाड्याची माहिती "शाहीर वरदी परशराम" या ग्रंथात दिली आहे. हा ग्रंथ शां.दे. जोशी देवीलक्ष्मी प्रकाशन यांनी १९८० साली प्रसिध्द केला आहे.

मी शाहीर परशरामाच्या लावण्यांचा अभ्यास करताना डॉ. गं.ना. मोरजे यांनी संपादित केलेली "शाहीर वरदी परशराम" ही मूळसंहिता आधारास घेतली आहे. त्यातील लावण्यांचा वापर वर्गीकरणामध्ये योग्य त्या ठिकाणी केला आहे. प्रत्येक लावणी विषयाचे वर्गीकरण केल्यानंतर त्या विषयाची वैशिष्ट्ये ही स्पष्ट केली आहेत. शाहीर परशरामांच्या लावण्यांचा अभ्यास केल्यानंतर शाहीर परशरामाच्या काव्याची जी वाङ्‌मयीन वैशिष्ट्ये आहेत ती स्पष्ट केली आहेत.

शाहीर परशरामाच्या लावणीचा अभ्यास करताना लावणीच्या उदय स्वरूप व प्रकार यांची थोडक्यात माहिती घेतली आहे. त्यानंतर लावणीच्या वेळची सामाजिक, राजकीय व धार्मिक परिस्थितीचे ओझरते दर्शन घेतले आहे. त्यानंतर शाहीर परशरामाचा जीवनवृत्तांत मांडून त्यांच्या लावण्यांचे सहा भागात वर्गीकरण केले आहे. ते सहा विभाग खालील प्रमाणे -

१) शृंगारिक लावण्या
२) आध्यात्मिक लावण्या
३) सामाजिक लावण्या
४) पौराणिक लावण्या
५) ईश्वरवर्णनपर लावण्या
६) इतर लावण्या

त्यांच्या इतर लावण्यांचा शोध घेताना त्यामध्ये कथाकथनपर, उपदेशपर, विनोदी, हिंदी लावण्यांचा शोध घेतला आहे. त्याचबरोबर परशरामाच्या पोवाड्याचाही शोध घेतला आहे.

शाहीर परशरामाच्या लावण्यांचा अभ्यास करताना मी शाहिरी वाङ्‌मयावरील उपलब्ध ग्रंथांचा व त्यातील मतांचा परामर्श त्या त्या ठिकाणी घेतला आहे व शाहीर परशरामाच्या व्यक्तिमनाचे त्यांच्या

लावण्यांचे विविध पैलू निर्देशनास आले ते या प्रबंधिकेच्या रूपाने मांडण्याचा मी प्रयत्न केला आहे.

.....